आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,

कुळगांव-बदलापूर

शिक्षकेतर सहकारी एक दिवसीय कार्यशाळा

## कार्यालयीन गुणवत्ता संवर्धन कार्यशाळा

**शुक्रवार दि. १३.०१.२०२३**

**अहवाल**

कार्यशाळेसाठी उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यशाळेच्या समन्वयक सौ मानसी ओक यांनी केले तसेच आभार प्रदर्शन श्री. दिलीप मोरे यांनी केले. तर पहिल्या सत्रासाठी कर्जत महाविद्यालयाचे अधिक्षक श्री. नरेश परदेसी यांनी सुत्र संचालन केले, दुसऱ्या सत्रासाठी पालघर येथील महाविद्यालयाचे डॉ. वैभव पंडीत यानी पाहुण्यांची ओळख व आभार सादर केले. तिसऱ्या सत्रासाठी चांगु कान्हा ठाकुर महाविद्यालयाचे मुख्य लिपीक श्री. गंगाराम सुर्वे यांनी पाहुण्यांची ओळख व आभार प्रदर्शन केले. समारोप आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात शिक्षकेतर सहकारी यांचेसाठी महाविद्यालयातील शिक्षकेतर सहकारी यांचेवतीने **कार्यालयीन गुणवत्ता संवर्धन कार्यशाळा** शुक्रवार दि. १३.०१.२०२३ रोजी आयोजीत करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पूणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकुण ६५ शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.

- या कार्यशाळेचे उद्घाटन मा. डॉ. संजय जगताप, सहसंचालक उच्च शिक्षण कोंकण विभाग यांचे हस्ते झाले तर उद्घाटनाच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. महालेखाकार(ए.जि.) या कार्यालयाचे निवृत्त लेखाधिकारी श्री. संजय कुंटे उपस्थित होते. उद्घाटनाच्या कार्यक्रमात श्री. संजय कुंटे यांनी निवृत्ती वेतन, लेखापरिक्षण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. संस्थेचे विश्वस्त श्री. रामभाउ पातकर या समयी उपस्थित होते.
- त्यानंतर पहिल्या सत्रात उच्च शिक्षण, कोंकण विभागाचे लेखाधिकारी श्री. चंद्रशेखर खामकर यांनी निवृत्ती पुर्वी निवृत्ती वेतन प्रस्ताव तयार करताना घ्यावयाची काळजी याविषयावर उत्तम मार्गदर्शन केले. या सत्रात उपस्थितांनी प्रश्नोत्तरांद्वारे उपरोक्त बाबींसंदर्भातील समस्यांचे निराकरण करुन घेतले.
- दुसऱ्या दुसऱ्या सत्रात श्री. संदीप ढवळे यांनी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना व डिसीपीएस या विषयावर मार्गदर्शन केले,
- तिसऱ्या सत्रात श्री. दिलीप मोरे माजी अधिक्षक, बिर्ला महाविद्यालय, कल्याण यांनी सातव्या वेतन आयोगातील त्रुटी, अश्वासित प्रगती योजनेतील १२/२४, १०/२०/३० यामधील समस्या व त्यांचे निराकरण या विषयावर मार्गदर्शन केले.

- समारोप कार्यक्रमापुर्वी मा. श्री. संजय कुंटे, निवृत्त लेखाधिकारी, अे.जि. कार्यालय, मुंबई यांनी पॉवर पॉइंट प्रझेंटेशन द्वारे अे.जि. कार्यालयाचे ऑडीट पॅरा, अर्थसंकल्प व त्यामधील तरतुदीनुसार करावयाचा खर्च, शिष्यवृत्ती यासंदर्भात सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.
- समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे (रुसा) सल्लागार डॉ. प्रमोद पाबरेकर यांनी शिक्षकेतर सहकाऱ्यांचे उच्च शिक्षणातील योगदान तसेच राष्ट्रीय शैक्षणीक धोरण या विषयावर अतिशय ओघवत्या शैलीत उपस्थितांना मार्गदर्शन केले.
- उपस्थित शिक्षकेतर सहकार्यांच्या अभिप्रायावरुन – कार्यशाळेचे आयोजन, व्याख्याते आणि इतर सर्वच बाबतीत ही कार्यशाळा यशस्वी झाल्याचे अधोरेखित झाले.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या मा. डॉ. संगीता पांडे, प्राचार्या तथा कार्यशाळा संयोजक यांनी प्रास्ताविकाद्वारे कार्यशाळेच्या उद्देशाबद्दल व आयोजनाबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी सल्लागार म्हणून श्री. समीर तांबे, अधिक्षक, श्री. लक्ष्मीकांत सातपुते, ग्रंथपाल आदर्श महाविद्यालय, श्री. दिलीप मोरे, माजी अधिक्षक, बिर्ला महाविद्यालय, कल्याण व श्री. अरुण पाटील, मुख्य लिपीक, भारत महाविद्यालय, बदलापूर यांनी विशेष मेहनत घेतली.

सत्राचे सुत्रसंचालन व आभार महाविद्यालयाच्या आ.य.क्यु.ए.सी. समन्वयक सौ दक्षा हलकारे यांनी केले.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयी सहकारी – श्री. दिलीप घोरपडे, सहसमन्वयक, श्री. संतोष कडाळी, श्री. मनोहर फुलवरे, श्री. पंढरीनाथ निरगुडा, श्री. अनिल सिंगरैय्या, श्री. सुनील नखाते, श्री. केतन गोळे, श्री. हरीश्चंद्र पवार, कु. प्रणाली मोरे, सौ. सारीका माळी व कु. प्राची जोशी तसेच श्री. मिलींद जोहरे व श्री संदेश यादव यांनी महत्वाचे योगदान देउन कार्यशाळा यशस्वी केली. अशारितीने कार्यशाळेची सांगता झाली.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. संगीता पांडे,**<br>**प्र. प्राचार्या** | **श्री. समीर तांबे,**<br>**अधिक्षक** | **सौ. मानसी ओक**<br>**समन्वयक** |